शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान कायम विनाअनुदानित तत्वावर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम, प्रवेश क्षमतेत वाढ/ घट, अभ्यासक्रम बंद, विद्यमान संस्थांच्या नावात बदल, विद्यमान संस्थेच्या पत्त्यात बदल, सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल, एकाच व्यवस्थापनामार्फत सुरू असलेल्या संस्था विलिन, पदविका एचएमसीटी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करणे, एनएसक्युएफ अंतर्गत डी. व्होकेशनल नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, डी. व्होकेशनल अभ्यासक्रम बंद करणे इ. साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शासन मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. मान्यता-२०२१/(प्र.क्र.९७/२१)तांशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०१ सप्टेंबर, २०२१.

संदर्भ : संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एनजीपी/एआयसीटीई/विना.मान्यता/२०२१/५७३, दिनांक २७.०७.२०२१.

प्रस्तावना :-

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान कायम विनाअनुदानित तत्वावर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम, प्रवेश क्षमतेत वाढ / घट, अभ्यासक्रम बंद, विद्यमान संस्थांच्या नांवात बदल, विद्यमान संस्थेच्या पत्त्यात बदल, सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल, एकाच व्यवस्थापनामार्फत सुरू असलेल्या संस्था विलिन, पदविका एचएमसीटी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करणे, एनएसक्युएफ अंतर्गत डी. व्होकेशनल नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, डी. व्होकेशनल अभ्यासक्रम बंद करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भाधिन पत्राव्दारे त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

शासन निर्णय :-

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान कायम विनाअनुदानित तत्वावर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम, प्रवेश क्षमतेत वाढ / घट, अभ्यासक्रम बंद, विद्यमान संस्थांच्या नांवात बदल, विद्यमान संस्थेच्या पत्त्यात बदल, सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल, एकाच व्यवस्थापनामार्फत सुरू असलेल्या संस्था विलिन, पदविका एचएमसीटी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करणे, एनएसक्युएफ अंतर्गत डी. व्होकेशनल नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, डी. व्होकेशनल अभ्यासक्रम बंद करण्यास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार सोबत जोडण्यात आलेल्या Annexure A ते I मध्ये नमुद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आल्यानुसार खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

| अ.क्र. | प्रपत्र | तपशिल |
|---|---|---|
| १ | **Annexure A** | विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पुर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पुर्ववत करणे. |
| २ | **Annexure B** | विद्यमान संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करणे. |
| ३ | **Annexure C** | विद्यमान संस्था/ महाविद्यालयाच्या नावांत बदल करणे. |
| ४ | **Annexure D** | विद्यमान संस्था/ महाविद्यालयाच्या पत्त्यात बदल करणे. |
| ५ | **Annexure E** | अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे. |
| ६ | **Annexure F** | एकाच व्यवस्थापनामार्फत सुरू असलेल्या संस्था विलिन करणे [Mergering] |
| ७ | **Annexure G** | पदविका एचएमसीटी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करणे. |
| ८ | **Annexure H** | एनएसक्युएफ अंतर्गत डी. व्होकेशनल अभ्यासक्रमाचे नवीन अभ्यासक्रम सुरु करणे. |
| ९ | **Annexure I** | एनएसक्युएफ अंतर्गत सद्या सुरू असलेले डी. व्होकेशनल अभ्यासक्रम बंद करणे. |

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता विवरणपत्रातील त्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

४. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

५. सदर पदविका अभ्यासक्रमांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अटी व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी डी. व्होकेशनल हा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी वेळोवेळी विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार सर्व बाबींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

७. अभ्यासक्रमाचे प्रवेश हे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुक २०२१-२२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करावेत. तसेच प्रवेशासंबंधीची प्रक्रिया, नियम व नियमन तसेच

ATTESTED
Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

अभ्यासक्रमांची शुल्क निश्चिती या बाबी संलग्नीत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी विहीत कराव्यात.

८. सदर अभ्यासक्रमांच्या मुदतवाढीस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याची कार्यवाही संस्थेने नियमाप्रमाणे करावी.

९. नव्याने मान्यता देण्यात आलेल्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुखांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील. सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

१०. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ते प्रक्रिया शुल्क व संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

११. सदर व्यावसायीक पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

१२. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

१३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१४. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

१५.सदर संस्था, संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१६.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१७.अभ्यासक्रमात बदल झाल्यामुळे / अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे भविष्यात जी काही परिस्थीती उद्भवते त्यास संबंधित संस्था जबाबदार राहतील. याप्रमाणे तसे हमीपत्र संबंधित संस्थांनी द्यावयाचे आहे.

१८. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१९.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे विहीत नोंदणी शुल्क अदा केलेले नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ते वसूल करावे. या शासन मान्यतेनुसार नवीन अभ्यासक्रमांचा / वाढीव प्रवेश क्षमतेचा समावेश शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेत करण्याची कार्यवाही पुढील १० दिवसाचे आत संचालक, तंत्रशिक्षण यांनी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०९०११५३५०४९७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANALI MILIND SAMANT

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
३. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सर्व संबंधित संस्था, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१,
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली,

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई,

९. अवर सचिव (तांशि-४), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

१०. निवड नस्ती/तांशि-५.

**ATTESTED**

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

**Annexure A**

List of New Courses/ Increse in Intake in Unaided Institutes, Approved by AICTE from A.Y.2021-22

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | 5226 | KARMAVEER KAKASAHEB WAGH POLYTECHNIC, NASHIK | HIRABAI HARIDAS VIDYANAGARI, AMRUTDHAM, PANCHAVATI, NASHIK | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ARTIFICIAL INTELLIGENCE (AI) AND MACHINE LEARNING | Un-aided | 0 | 60 | 60 | Application for new course |
| 17 | 5238 | MAHAVIR POLYTECHNIC | GUT NO. 166, MHASRUL-VARVANDI ROAD, TALUKA - DINDORI, DISTRICT - NASHIK. (M.S.) | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | INFORMATION TECHNOLOGY | Un-aided | 0 | 60 | 60 | Application for new course |
| 18 | 5240 | GURU GOBIND SINGH POLYTECHNIC, NASHIK | KHALSA EDUCATIONAL COMPLEX, WADALA PATHARDI ROAD,GURU GOBIND SINGH MARG, NASHIK - 9 | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | MECHATRONICS | Un-aided | 0 | 60 | 60 | Application for new course |
| 19 | 5411 | MAULANA MUKHTAR AHMAD NADVI TECHNICAL CAMPUS | MANSOORA, MALEGAON-MANMAD ROAD, P.O.BOX 144, | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER ENGINEERING | Un-aided | 0 | 60 | 60 | Application for new course |
| 20 | 5433 | R. C. PATEL POLYTECHNIC, SHIRPUR | SURVEY NO. 41/1, NEAR BALAJI NAGAR, OPPOSITE TO R. C. PATEL EDUCATIONAL COMPLEX, KARAVAND ROAD, SHIRPUR - 425405; DIST: DHULE (MS) | DHULE | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER SCIENCE & ENGINEERING | Un-aided | 0 | 60 | 60 | Application for new course |
| 21 | 6214 | KASEGAON EDUCATION SOCIETYS RAJARAMBAPU INSTITUTE OF TECHNOLOGY | RAJARAMNAGAR, SAKHARALE, TAL. WALWA, DIST. SANGLI | SANGLI | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER ENGINEERING | Un-aided | 0 | 60 | 60 | Application for new course |
| 22 | 6214 | KASEGAON EDUCATION SOCIETYS RAJARAMBAPU INSTITUTE OF TECHNOLOGY | RAJARAMNAGAR, SAKHARALE, TAL. WALWA, DIST. SANGLI | SANGLI | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER HARDWARE & MAINTENANCE | Un-aided | 0 | 30 | 30 | Application for new course |

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

शासन निर्णय क्र. मान्यता-2021 (प्र.क्र.97/21)/तांशि-5, दि.01/09/21 सोबतचे

**Annexure A**

List of New Courses/ Increse in Intake in Unaided Institutes, Approved by AICTE from A.Y.2021-22

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 5240 | GURU GOBIND SINGH POLYTECHNIC, NASHIK | KHALSA EDUCATIONAL COMPLEX, WADALA PATHARDI ROAD,GURU GOBIND SINGH MARG, NASHIK - 9 | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | CIVIL ENGINEERING | Un-aided | 60 | 90 | 30 | EoA & Increase in intake |
| 31 | 6406 | KARMAVEER BHAURAO PATIL POLYTECHNIC, SATARA. | GAT NO. 242/B/1 AT PANMALEWADI POST VARYE | SATARA | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER ENGINEERING | Un-aided | 60 | 120 | 60 | EoA & Increase in intake |
| 32 | 6410 | Y. B. PATIL POLYTECHNIC | PCNTDA, SECTOR-29, AKURDI | PUNE | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER ENGINEERING | Un-aided | 60 | 120 | 60 | EoA & Increase in intake |
| 33 | 2298 | SHRI SAI INSTITUTE OF TECHNOLOGY | PLOT NO. P-75, BEHIND GARWARE POLYESTER LTD., MIDC, CHIKALTHANA, AURANGABAD | AURANGABAD | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER SCIENCE & ENGINEERING | Un-aided | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 34 | 4238 | SHRI KRISHNARAO PANDAV POLYTECHNIC | BAHADURA | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | Un-aided | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 35 | 4605 | GURUKUL POLYTECHNIC NAGRA,GONDIA | AT+PO:NAGRA TAL:GONDIA DIST:GONDIA | GONDIA | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | CIVIL ENGINEERING | Un-aided | 0 | 60 | 60 | EoA Only |
| 36 | 4605 | GURUKUL POLYTECHNIC NAGRA,GONDIA | AT+PO:NAGRA TAL:GONDIA DIST:GONDIA | GONDIA | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER TECHNOLOGY | Un-aided | 0 | 60 | 60 | EoA Only |
| 37 | 4605 | GURUKUL POLYTECHNIC NAGRA,GONDIA | AT+PO:NAGRA TAL:GONDIA DIST:GONDIA | GONDIA | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ELECTRICAL ENGINEERING | Un-aided | 0 | 60 | 60 | EoA Only |

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik

शासन निर्णय क्र. मान्यता-2021 (प्र.क्र.97/21)/तांशि-5, दि.01/09/21 सोबतचे

Annexure B

List of Closure of Courses/ Decrese in Intake in Unaided Institutes/ Courses, Approved by AICTE from A.Y.2021-22

| Sr No | Institute Code | Institute Name | Institute Address | District | Institution Type | Program | University | Level | Name of Course | Course Status | Intake Approved for 2020-21 | Intake Approved for 2021-22 | Variation | Course Applied for |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 77 | 4249 | SONATAI PANDAV POLYTECHNIC | SURVEY NO.73,AT. LAMDHAM, POST-PARADSINGA,TAH-KATOL. | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ELECTRICAL ENGINEERING | Un-aided | 60 | 45 | -15 | EoA Only |
| 78 | 4249 | SONATAI PANDAV POLYTECHNIC | SURVEY NO.73,AT. LAMDHAM, POST-PARADSINGA,TAH-KATOL. | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | Un-aided | 60 | 45 | -15 | EoA Only |
| 79 | 4249 | SONATAI PANDAV POLYTECHNIC | SURVEY NO.73,AT. LAMDHAM, POST-PARADSINGA,TAH-KATOL. | NAGPUR | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | MECHANICAL ENGINEERING | Un-aided | 60 | 45 | -15 | EoA Only |
| 80 | 4253 | DR. ARUN MOTGHARE POLYTECHNIC | KOSRA-KONDHA | BHANDARA | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | COMPUTER TECHNOLOGY | Un-aided | 60 | 30 | -30 | EoA Only |
| 81 | 4253 | DR. ARUN MOTGHARE POLYTECHNIC | KOSRA-KONDHA | BHANDARA | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | Un-aided | 60 | 30 | -30 | EoA Only |
| 82 | 5240 | GURU GOBIND SINGH POLYTECHNIC, NASHIK | KHALSA EDUCATIONAL COMPLEX, WADALA PATHARDI ROAD,GURU GOBIND SINGH MARG, NASHIK - 9 | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | MECHANICAL ENGINEERING | Un-aided | 180 | 150 | -30 | EoA Only |
| 83 | 5244 | MET'S INSTITUTE OF TECHNOLOGY-POLYTECHNIC | BHUJBAL KNOWLEDGE CITY GAT NO.1071 ADGAON | NASHIK | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | MECHANICAL ENGINEERING | Un-aided | 120 | 90 | -30 | EoA Only |

ATTESTED

Principal
Guru Gobind Singh Polytechnic
Nashik